माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम
४(१)(अे) (बी) च्या अंमल बजावणीबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१५ /प्र.क्र.(४७ /१५) सहा.
मंत्रालय, मुंबई — ४००० ३२.
दिनांक:- ५.५.२०१५.

पहा- (१) शासन आदेश क्र.केमाअ २००९/६३१/प्र.क्र२६७/०९/सहा दि.२४.७.२००९.
(२) शासन परिपत्रक क्र.केमाअ २०१३/१५६/प्र.क्र३६०/सहा दि.९.५.२०१४.
(३) शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१४ /प्र.क्र.( २४०/१४) सहा दि.१३.२.२०१५.

परिपत्रक:-

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(३) मध्ये नमूद केलेल्या बाबींसंदर्भात चौकशी करण्यासाठी राज्य माहिती आयोगास दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) अन्वये दाव्याची न्यायचौकशी करताना, दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित करण्यात आलेले आहेत, तेच अधिकार असतील असे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच सदर अधिनियमाच्या कलम १९(७) अन्वये तक्रारी व व्दितीय अपीलासंदर्भातील आयोगाचा निर्णय बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे आयोगाने सार्वजनिक प्राधिकरणांना दिलेले निर्देश, तक्रारी व व्दितीय अपीलावरील आयोगाचे निर्णय इत्यादिचे अनुपालन विहित कालावधीत करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी सूचनाही प्रसारित केल्या आहेत. तथापि, काही सार्वजनिक प्राधिकरणाकडून आयोगास योग्य प्रतिसाद मिळत नसल्याचे मा.मुख्य माहिती आयुक्तांनी दि.१६.३.२०१५ रोजी झालेल्या बैठकीत निदर्शनास आणले असून माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांना नोडल अधिकारी घोषित करून लोकशाही दिनाच्या दिवशी त्यांनी जिल्हा प्रमुखांच्या सभेत माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणीचा आढावा घ्यावा अशा सूचना काढण्याची आवश्यकता प्रतीत केली आहे. त्यावर मा.मुख्य सचिवांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचित करण्यात येईल असे बैठकीत सांगितले आहे. तदनुसार माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांना नोडल अधिकारी घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

२. उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. लोकशाही दिनाच्या दिवशी त्यांनी

जिल्हा प्रमुखांच्या सभेत माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याचेही त्यांना सूचित करण्यात येत आहे. त्यानुसार, संबंधित जिल्हाधिकारी यांनी आवश्यक कार्यवाही करावी व त्याबाबतचा अहवाल राज्य माहिती आयोगास थेट सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

( र.व.गुरव)
शासनाचे उप सचिव.

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव.
सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग (प्रशासकीय अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह )
सर्व विभागीय आयुक्त
महासंचालक, यशदा, पुणे
सर्व जिल्हाधिकारी
निवडनस्ती, सा.प्र.वि. कार्यासन सहा.

*पत्राने